ePaper

# PM किसान योजनेचे पैसे दुप्पट होणार? वार्षिक रक्कम 6000 वरून 12000 रुपये करणार

वर्ष - 9 I अंक -108 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज (TM)

## आतील पानांत


- अर्शदीप हे काय करून बसला!
- क्विंटन डी कॉकचे वादळी अर्धशतक!
- २०२९ मध्ये मोठी राजकीय लढत?
- स्टंट करणाऱ्याच्या याचिका बंद


www.mahaenews.com I शनिवार, दि. 13 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
43 Years of Excellence in Education

EMPOWERING YOUNG MINDS
TO CREATE A STRONGER TOMORROW.

ADMISSIONS OPEN
FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade XII

WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

- 43 Years of Excellence in Education
- Advanced Robotics & Computer Labs
- Experienced and Dedicated Faculty
- Multiple Sports Grounds for All-Round Development
- Proven 100% Results in Grade X
- A Perfect Blend of Tradition and Innovation



ENROLL NOW

OFFICE HOURS:
MONDAY TO SATURDAY, 8 AM – 5 PM

+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in



| वर्ष - 9 | अंक -108 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 13 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- अर्शदीप हे काय करून बसला!
- क्विंटन डी कॉकचे वादळी अर्धशतक!
- २०२९ मध्ये मोठी राजकीय लढत?
- स्टंट करणाऱ्याच्या याचिका बंद

### ९० हजार ब्रासचा घोटाळा उघड! महसूलमंत्री बावनकुळे यांची कडक कारवाई –

# चार तहसीलदारांसह 10 अधिकारी निलंबित!

## मावळ तालुक्यात परवानगीपेक्षा ९० हजार ब्रास अधिक उत्खनन

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात झालेल्या अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणाने संपूर्ण महसूल प्रशासनाला हादरवून सोडलं आहे. परवानगीपेक्षा तब्बल ९० हजार ब्रास अधिक उत्खनन झाल्याचं ईटीएस (इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन) मोजणीतून निष्पन्न झाल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत मोठी आणि कठोर कारवाई जाहीर केली.**

:या गैरव्यवहारात कर्तव्यात कसूर आणि दुर्लक्ष केल्याबद्दल चार तहसीलदार, चार मंडल अधिकारी आणि दोन तलाठी, अशा एकूण दहा अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं आहे. या निर्णयामुळे पुणे जिल्ह्यासह राज्यभरातील महसूल यंत्रणेत खळबळ उडाली आहे. आमदार सुनील शेळकेंची लक्षवेधी ठरली निर्णायक या प्रकरणाचा उलगडा मावळचे आमदार सुनील शेळके यांनी विधानसभेत मांडलेल्या लक्षवेधीमुळे झाला. शेळके यांनी अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करत, “गेल्या आठ महिन्यांपासून माहिती दडपली जात आहे. चुकीचे अहवाल सादर करून अवैध उत्खनन करणाऱ्यांना पाठीशी घालण्यात आलं,” असा थेट आरोप केला. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. यानंतर महसूलमंत्री बावनकुळे यांनी तत्काळ विभागीय चौकशी अहवालाचा हवाला देत कारवाई जाहीर केली.



**ईटीएस मोजणीत उघड झाला ९० हजार ब्रासचा फरक**

विभागीय आयुक्तांनी दोन टप्प्यांत केलेल्या चौकशीत आणि अत्याधुनिक ईटीएस मोजणीतून धक्कादायक वास्तव समोर आलं. संबंधित कंत्राटदाराला ३ लाख ६३ हजार ब्रास उत्खननाची परवानगी देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष मोजणीत ४ लाख ५४ हजार ब्रास उत्खनन झाल्याचं स्पष्ट झालं. म्हणजेच, परवानगीपेक्षा ९० हजार ब्रास जादा उत्खनन बेकायदेशीररीत्या करण्यात आलं. याशिवाय, परवानगी असलेले गट क्रमांक ३६, ३७ आणि ३८ यांपुरतेच उत्खनन मर्यादित न राहता ३५, ४१, ४२ आणि ४६ या गट क्रमांकांमध्येही अनधिकृत खोदकाम झाल्याचं निष्पन्न झालं आहे.

- ईटीएस मोजणीत घोटाळा उघड; दोषींवर फौजदारी गुन्हे,
- दंड आणि सातबारा उताऱ्यावर बोजा
- मावळ उत्खनन प्रकरण | ४ तहसीलदार, ४ मंडल अधिकारी, २ तलाठी निलंबित
- अवैध उत्खननावर सरकारचा ‘झिरो टॉलरन्स’
- राज्यभर ईटीएस सर्वे

**कोणावर झाली कारवाई?**

या काळात संबंधित ठिकाणी कार्यरत असलेल्या आणि उत्खननाकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत महसूल विभागाने निलंबनाची कडक कारवाई केली.

**निलंबित तहसीलदार :** जोगेंद्र कटियार, मनजीत देसाई, मधुसूदन बर्गे, विक्रम देशमुख. निलंबित मंडल अधिकारी : संदीप बोरकर, माणिक साबळे, अजय सोनवणे, रमेश कदम. निलंबित तलाठी : दीपाली सनगर, गजानन सोटपल्लीवार. केवळ निलंबन नाही, तर गुन्हेही दाखल महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, “ही कारवाई केवळ निलंबनापुरती मर्यादित राहणार नाही.” संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार असून, ९० हजार ब्रासच्या अवैध उत्खननाचा दंड, त्यावरील व्याजासह वसुली केली जाईल. दंड न भरल्यास सातबारा उताऱ्यावर बोजा चढवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. तसेच, निलंबित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करून त्याचा अहवाल पुढील अधिवेशनात सादर केला जाणार आहे.

**वनीकरण आरक्षित’ क्षेत्रावर वाद**

या प्रकरणात उत्खनन वनीकरणासाठी राखीव क्षेत्रात झाल्याचा मुद्दा आमदार शेळके यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना महसूलमंत्री म्हणाले, “ही जमीन खाजगी असून वन विभागाच्या लेखी नोंदीनुसार हा ‘फॉरेस्ट झोन’ नाही. गुगल इमेजमध्ये केवळ १५ झाडे दिसत होती आणि ती तोडण्यासाठी परवानगी घेण्यात आली होती.” मात्र, त्यांनी हेही मान्य केलं की पीएमआरडीएच्या प्रस्तावित विकास आराखड्यात ही जमीन खासगी वनीकरण म्हणून दर्शवण्यात आली आहे. या तांत्रिक बाबींवर आवश्यकता भासल्यास स्वतंत्र बैठक घेऊन चर्चा केली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**राज्यभर ईटीएस सर्वे – अवैध उत्खननाला लगाम**

या प्रकरणानंतर राज्यातील अवैध उत्खननावर कडक कारवाईचा निर्धार सरकारने व्यक्त केला आहे. प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावाचा ईटीएस सर्वे करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. यामुळे परवानगी दिलेलं उत्खनन आणि प्रत्यक्षात झालेलं उत्खनन यातील तफावत तात्काळ समोर येणार असून, दोषींवर तत्काळ कारवाई शक्य होणार आहे.

## प्रशासनाला इशारा, जनतेला दिलासा

मावळमधील ९० हजार ब्रास उत्खनन प्रकरणातील ही कारवाई म्हणजे महसूल प्रशासनासाठी स्पष्ट इशारा आहे. कर्तव्यात कसूर आणि गैरव्यवहार सहन केला जाणार नाही, हा संदेश सरकारने दिला आहे. दुसरीकडे, पर्यावरणाची हानी आणि शासकीय महसुलाचा अपव्यय रोखण्यासाठी ही कारवाई महत्त्वाची ठरणार आहे. एकंदरीत, महसूलमंत्री बावनकुळे यांच्या या धडक कारवाईने अवैध उत्खनन करणारे आणि त्यांना पाठीशी घालणारे अधिकारी यांच्यात खळबळ उडाली असून, राज्यभरात या निर्णयाची चर्चा सुरू आहे.

## सध्या थंडीची लाट कायम

## यंदाच्या हंगामातील नीचांकी तापमानाची नोंद

# शहरात कडाक्याची थंडी कायम

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात सध्या थंडीची लाट कायम असून पुणे शहरात या हंगामातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे मध्य महाराष्ट्रासह पुण्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात लक्षणीय घट झाली आहे. पुण्यात सलग तिसऱ्या दिवशी पारा दहा अंश सेल्सिअसच्या खाली घसरला.**

## पारा दहा अंश सेल्सिअसच्या खाली



## नुसती हुडहुडी अन् कुडकुडी

तर हौशी पुणेकर वेगवेगळ्या प्रकारचे स्वेटर, शाल, जर्किन परिधान करून थंडीत फिरण्याचा आनंद घेत आहेत. उपनगरांतील सोसायट्या, दुकानदार आणि सुरक्षारक्षक शेकोट्या पेटवून ऊब घेताना दिसत आहेत. शुक्रवारी (दि. १२) पुणे आणि परिसरात किमान तापमान ८.३ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. पाषाण भागात यंदाचे नीचांकी ७.७ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदले गेले.

गुरुवारी पुण्यात किमान तापमान ७.९ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. पहाटेच नव्हे तर दिवसभर हवेत गारवा जाणवत होता. निरभ्र आकाश आणि कोरडे वातावरणामुळे थंडीचा कडाका अधिक तीव्र झाला. उपनगरांमध्ये तर गारठा अधिक जाणवला. दिवसभरातील कमाल तापमान २८.७ अंश सेल्सिअस होते.थंडीचा आनंद लुटण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने सकाळी व संध्याकाळी टेकड्या, उद्यानांकडे धाव घेत आहेत. तर हौशी पुणेकर वेगवेगळ्या प्रकारचे स्वेटर, शाल, जर्किन परिधान करून थंडीत फिरण्याचा आनंद घेत आहेत. उपनगरांतील सोसायट्या, दुकानदार आणि सुरक्षारक्षक शेकोट्या पेटवून ऊब घेताना दिसत आहेत. शुक्रवारी (दि. १२) पुणे आणि परिसरात किमान तापमान ८.३ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. पाषाण भागात यंदाचे नीचांकी ७.७ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदले गेले.भारतीय हवामान विभागानुसार, पुढील काही दिवस पुण्यात किमान तापमान दहा अंश सेल्सिअसच्या खालीच राहण्याची शक्यता असून शनिवारी आणि रविवारी किमान तापमान ९ अंश सेल्सिअस राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कमाल तापमानात किंचित वाढ होऊ शकते, परंतु थंडी कायम राहणार आहे. तसेच पुढील दोन दिवस आकाश मुख्यतः निरभ्र राहून सकाळच्या वेळी विरळ धुके पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.उत्तर भारतातून येणाऱ्या गार वाऱ्यांचा जोर वाढल्याने महाराष्ट्रातील तापमानात मोठी घसरण झाली आहे. राज्यातील अनेक शहरांत किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या आसपास किंवा त्याखाली नोंदवले जात आहे. गुरुवारी मुंबईचे किमान तापमान १५ अंश, तर माथेरानमध्ये १७ अंश इतकी नोंद झाली. अहिल्यानगरमध्ये सर्वाधिक थंडी जाणवत असून येथे पारा ६.६ अंशांवर घसरला आहे. सलग तिसऱ्या दिवशी राज्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद याच जिल्ह्यात झाली आहे.पुणे आणि नाशिकमध्येही तापमान ७ ते ८ अंशांपर्यंत खाली आले आहे. हवामान विभागाचा अंदाज आहे की उत्तर भारतातून वेगाने येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे पुढील दोन दिवस राज्यात थंडीची लाट कायम राहणार आहे. मध्य, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील अनेक भागांत पाऱ्याची घसरण यापुढेही सुरू राहण्याची शक्यता आहे.महाराष्ट्रात सध्या थंडीची लाट कायम असून पुणे शहरात या हंगामातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे मध्य महाराष्ट्रासह पुण्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात लक्षणीय घट झाली आहे. पुण्यात सलग तिसऱ्या दिवशी पारा दहा अंश सेल्सिअसच्या खाली घसरला.

गुरुवारी पुण्यात किमान तापमान ७.९ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. पहाटेच नव्हे तर दिवसभर हवेत गारवा जाणवत होता. निरभ्र आकाश आणि कोरडे वातावरणामुळे थंडीचा कडाका अधिक तीव्र झाला. उपनगरांमध्ये तर गारठा अधिक जाणवला. दिवसभरातील कमाल तापमान २८.७ अंश सेल्सिअस होते.थंडीचा आनंद लुटण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने सकाळी व संध्याकाळी टेकड्या, उद्यानांकडे धाव घेत आहेत.

# म्हाडाच्या पुणे मंडळाची सोडत

## 4186 घरांसाठी दोन लाखांहून अधिक अर्जदारांची प्रतीक्षा संपली

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ४१८६ घरांच्या सोडतीसाठी नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया संपुष्टात येऊन बरेच दिवस झाले तरी सोडतीची तारीख जाहीर करण्यात आली नव्हती. त्यामुळे दोन लाख १५ हजारांहून अधिक अर्जदारांना सोडतीच्या तारखेची प्रतीक्षा होती.**




## ५० हून अधिक अर्जदार प्राप्त

पुणे जिल्हा परिषदेच्या सभागृहात सोडत काढण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सोडत पार पडावी यासाठी म्हाडा प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांची वेळ १६ किंवा १७ डिसेंबरपैकी ज्या दिवशी मिळेल त्या दिवशी सोडत काढली जाणार असल्याचेही सांगितले. त्यामुळे आता दोन लाखांहून अधिक अर्जदारांची सोडतीची प्रतीक्षा संपणार आहे. दरम्यान, या सोडतीला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. एका घरामागे ५० हून अधिक अर्जदार प्राप्त झाले आहेत.

अखेर ही प्रतीक्षा संपुष्टात आली. पुणे मंडळाने १६ किंवा १७ डिसेंबर रोजी सोडत काढण्याचा निर्णय घेतला असून अंतिम तारीख एक-दोन दिवसांत जाहीर केली जाणार आहे. पुणे मंडळाने २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ३२२२ घरे आणि १५ टक्के एकात्मिक योजनेतील ८६४ घरे अशा एकूण ४१८६ घरांसाठी ११ सप्टेंबरपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू केली. मात्र संगणकीय प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे या प्रक्रियेला दोन वेळा मुदतवाढ देण्याची नामुष्की मंडळावर ओढवली. या मुदतवाढीमुळे २१ नोव्हेंबरची सोडत ११ डिसेंबरवर गेली, तर पुढे ११ डिसेंबरची सोडतही पुढे ढकलावी लागली. मात्र सोडतीची नवीन तारीख जाहीर न करताच पुणे मंडळाने सोडतपूर्व प्रक्रिया पूर्ण केली. त्यानुसार ४१८६ घरांसाठी अनामत रक्कमेसह दोन लाख १५ हजार ८४७ अर्ज सादर झाले. या अर्जांच्या माध्यमातून अनामत रक्कमेपोटी मंडळाकडे ४४६ कोटी ९७ लाख रुपये जमा झाले.प्राप्त अर्जांची छाननी सध्या सुरू असून एक-दोन दिवसांत पात्र अर्जांची यादी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.पण आता मात्र पुणे मंडळाने १६ किंवा १७ डिसेंबर रोजी सोडत काढण्याचा निर्णय घेतल्याची माहिती पुणे मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. अंतिम निर्णय, सोडतीची अंतिम तारीख एक-दोन दिवसात जाहीर होईल.

## राज्य शासनाची कडक भूमिका: अन्न व औषध प्रशासन विभागाच्या छाप्यात पिंपरी-चिंचवडमधील

# बनावट सौंदर्यप्रसाधने प्रकरणावर कठोर कारवाई!

### विशेष चौकशी पथक नेमण्याची तयारी : अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये बनावट सौंदर्यप्रसाधनांमुळे नागरिकांना त्वचेचे विकार झाल्याच्या गंभीर प्रकरणावर राज्य शासनाने कडक भूमिका घेतली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने छाप्यात 36 हजार 700 रुपयांचा माल जप्त केला आहे. तपासानंतर प्रकरण पोलीसांकडे देण्यात आले असून विशेष चौकशी पथक नेमणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली.**

राज्यात औषध निरीक्षक मनुष्यबळाची कमतरता असून 1.45 लाख औषध दुकानांसाठी 42 निरीक्षक कार्यरत आहेत. रिक्त पदे भरण्यासाठी 109 उमेदवारांची नियुक्ती, तसेच 56 निरीक्षक पदांचा निकाल मार्चपर्यंत अपेक्षित आहे.

धायरी येथील एक आणि भिवंडी येथील एक अशा दोन कंपन्यांमधील तपासणी दरम्यान ₹1.16 कोटींचा माल जप्त झाला असून त्यांच्यावर खटले दाखल करण्यात आले आहेत. उत्पादनाच्या मूळ स्रोतापर्यंत पोहोचून कठोर कारवाई करणार असल्याचेही मंत्री झिरवळ यांनी यावेळी सांगितले.




# फरार माजी नगरसेवक तापकीरवर मोक्का कारवाई

### चालू वर्षात पिंपरी-चिंचवड पोलिसांची 35 गुन्हेगारी टोळ्यांतील 179 गुन्हेगारांवर मोक्का अंतर्गत कारवाई

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चऱ्होली येथे आर्थिक वादातून एका व्यावसायिकाच्या डोक्यात गोळ्या घालून निर्घृण हत्या केल्याच्या खळबळजनक गुन्ह्यात फरार असलेला माजी नगरसेवक किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर याच्यासह सहा जणांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दिघी पोलिसांनी सादर केलेला प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर मंजूर झाल्यानंतर ही कठोर कारवाई करण्यात आली असून, शहरातील संघटित गुन्हेगारीवर पोलिसांनी पुन्हा एकदा निर्णायक आघात केला आहे.**




या प्रकरणात आर्थिक वादातून नितीन गिलबिले या व्यावसायिकाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. या गुन्ह्यात पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे, तर माजी नगरसेवक किसन तापकीर हा अद्याप फरार असून तोच या गुन्ह्याचा मास्टरमाइंड असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तापकीरच्या टोळीवर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, संघटित पद्धतीने दहशत निर्माण करून आर्थिक फायद्यासाठी गुन्हे केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

दिघी पोलिसांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, या सात जणांच्या टोळीवर मोक्का लागू करण्यात आला आहे. या टोळीतील आरोपींवर एकूण सात गंभीर गुन्हे दाखल आहेत. मोक्का कारवाई झालेल्या टोळीमध्ये टोळी प्रमुख अमित जीवन पठारे (३३, रा. चऱ्होली बुद्रुक), विक्रांत सुरेश ठाकूर (३८, रा. सोळू, खेड), सुमित फुलचंद पटेल (३१, रा. दिघी), आकाश सोमनाथ पाठारे (२३, रा. चऱ्होली बुद्रुक), सोमनाथ प्रकाश पाटोळे (२४, रा. सोळू, खेड) आणि किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर (रा. चऱ्होली बुद्रुक) यांचा समावेश आहे. या टोळीच्या कारवायांमुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती.

दरम्यान, दिघी पोलिसांनी आणखी एका सराईत गुन्हेगारी टोळीवर मोक्काचा प्रस्ताव पाठवला होता. टोळी प्रमुख विक्रांत उर्फ सरडा प्रकाश देवकुळे (२४) याच्यासह सुरज राजू चव्हाण (२०), साहिल उर्फ विश्वास मुकेश लोट (१९) आणि शुभम सुमित डिंगीया (२४, सर्व रा. बोपखेल) या टोळीवर एकूण सात गंभीर गुन्हे दाखल आहेत. वरिष्ठांनी हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर या टोळीवरही मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

चिखली परिसरात दहशत माजवणारा सराईत गुन्हेगार अनिरुद्ध उर्फ बाळ्या उर्फ विकी राजू जाधव याच्या टोळीवर देखील मोक्का लावण्यात आला आहे. या टोळीमध्ये विकी जाधवसह सोहन राजू चंदेलिया (२३, रावेत), प्रद्युमन राजकुमार जवळगे (२५, चाकण), यश उर्फ गोंद्या आकाश खंडागळे (२१, निगडी), अभिषेक उर्फ बकासुर चिमाजी पवार (२२, चिंचवड), शुभम गोरखनाथ चव्हाण (३०, आकुर्डी), अनिकेत अशोक बाराथे (२७, दापोडी), अश्विन सुधीर गायकवाड (२१, दापोडी), यशपालसिंग अरविंद सिंग देवडा (१९, सांगवी) आणि पाच अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. या टोळीतील सदस्यांवर तब्बल १५ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.

एमआयडीसी भोसरी परिसरातील आणखी एका संघटित गुन्हेगारी टोळीवरही पोलिसांनी मोक्काची कारवाई केली आहे. टोळी प्रमुख राहुल अप्पासाहेब लोहार (२७, उरुळी कांचन) याच्यासह हृतिक प्रकाश गायकवाड (२४, चाकण), आकाश दिनकर गायकवाड (२४, मोशी), गणेश बबन वहिले (२३, डुडुळगाव) आणि शिवतेज ज्ञानेश्वर ठाकरे (२४, डुडुळगाव) यांच्यावर १० गंभीर गुन्हे दाखल असून, त्यांच्या टोळीवरही मोक्का लावण्यात आला आहे. या चारही टोळ्यांमधील आरोपींवर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, दंगा करून तोडफोड, गंभीर दुखापत, बेकायदेशीर जमाव जमवून मारहाण, अमली पदार्थ विक्री, चोरी, अपहरण आणि शस्त्र बाळगणे यांसारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे शहरातील चिखली, निगडी, शिरगाव, रावेत, चिंचवड, वाकड, देहूरोड, एमआयडीसी भोसरी, दिघी, हिंजवडी, दापोडी, सांगवी, आळंदी, विश्रांतवाडी, खडकी, कोंढवा आणि उत्तमनगर पोलीस ठाण्यांत दाखल आहेत.

### कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशाच प्रकारची कडक कारवाई सुरू राहील

पिंपरी-चिंचवड पोलिसांनी चालू वर्षात आतापर्यंत ३५ गुन्हेगारी टोळ्यांमधील १७९ गुन्हेगारांवर मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे. संघटित गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पोलिसांनी घेतलेली ही कठोर भूमिका असून, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशाच प्रकारची कडक कारवाई पुढेही सुरू राहील, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.



## भूमिका

**नाशिकच्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवन परिसरातील असलेले मोठ्या प्रमाणातील सुमारे १८०० झाडे तोडून तेथे साधुग्राम उभारण्याचा प्रस्ताव समोर आल्यानंतर या वृक्षतोडीला केवळ नाशिकमधूनच नव्हे, तर राज्यभरातून वेगवेगळ्या स्तरांवर विरोध होत असून, एकीकडे झाडे लावा-झाडे जगवा अशा घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे झाडांची कत्तल करायची हा निश्चितच योगायोग म्हणता येणार नाही.**

# लोकचळवळीची ताकद कमी लेखू नका...




पुढील दोन वर्षांच्या कालावधीमध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने सरकारी पातळीवर जोरदार तयारी सुरू असतांनाच या तयारीला छेद देणारी वादाची किनारही समोर आली असून, दर बारा वर्षांनी भरणाऱ्या या कुंभमेळ्यामध्ये हजारो साधू-महंत येणार असल्याने त्यांच्या निवासाची सोय करण्यासाठी नाशिकजवळील तपोवनमध्ये जवळपास १८०० झाडांची तोड करण्यात येणार असल्याने त्यावरूण वाद निर्माण झाला आहे.नाशिक महानगरपालिकेनेच काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रांमध्ये टेंडर नोटीस प्रसिद्ध करून अशा प्रकारे वृक्षांची कत्तल करूण त्या ठिकाणी साधूंच्या निवासाची सोय करण्यात येणार असल्याची माहिती दिली होती.

याव्यतिरिक्त या ठिकाणी बिझनेस सेंटरही उभारण्यात येणार असल्याची माहिती समोर येते आहे. गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणांत पर्यावरणाबाबत सजगता आल्याने एखादे झाड जरी कोणी तोडत असले तरी मोठ्या प्रमाणावर विरोध केला जातो आणि या साधुग्राममधील साधुंच्या निवास प्रकल्पाच्या निमित्ताने १७०० पेक्षा जास्त झाडांची कत्तल होणार असल्याने या प्रक्रियेला विरोध होणे साहजिकच आहे.सरकारतर्फे आणि नाशिक महानगरपालिकेतर्फे या निर्णयाचे समर्थन करतांना जेवढी झाडे तोडली जातील, त्याच्या दहापट झाडे इतरत्र लावली जातील अशा प्रकारची माहिती दिली जात असली तरी मुळात अशा प्रकारे झाडे तोडून एखादा प्रकल्प राबवणे कितपत योग्य आहे त्याचाही विचार करावा लागेल.

राज्याच्या राजकीय आणि सामाजिक व्यासपीठावर या साधूंच्या निमित्ताने संधीसाधू घटकांचा चेहराही समोर येऊ लागला आहे.कुंभमेळ्यासारखा धार्मिक उत्सव आयोजित केला जातो तेव्हा त्याला आर्थिक किनार नेहमीच असते. धार्मिक अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणूनच अशा प्रकारच्या उत्सवांकडे नेहमीच पाहिले जाते. या निमित्ताने बाजारामध्ये जोमात उलाढाल होते, रोजगार निर्माण होतो आणि संबंधित प्रदेशामध्ये पैसा खेळता राहतो. कुंभमेळा झाल्यानंतर साधुग्राममधील साधुंच्या निवासाचा प्रकल्प बिझनेस सेंटर म्हणून वापरला जाणार असल्याची जी बाब समोर येत आहे तो अशाच प्रकारचा एक संधीसाधूपणा मानावा लागेल.कोणत्याही कुंभमेळ्याचे मुख्य आकर्षण असणारे जे साधू असतात त्यांना कोणत्याही प्रकारच्या हायफाय सोईसुविधांची किंवा सवलतींची गरज नसते व त्यांची तशी अपेक्षाही नसते. पण साधूंच्या निवासाची ही संधी साधून सरकारी पातळीवर आणि नाशिक-महानगर पातळीवर अशा प्रकारचा एक निवासी प्रकल्प विकसित करण्याची संधी साधली जात आहे असे दिसते. तपोवनासंदर्भात नाशिककरांचा आक्रोश हा फक्त भावनिक उद्रेक म्हणून बाजूला सारणे हा अनाठायी अहंकार ठरेल. वृक्षतोडीविरोधी मोर्चात केवळ डावे, उजवे कार्यकर्तेच नाही तर त्यात पर्यावरणप्रेमी, कलावंत, तृतीयपंथीय, जेष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकारणी हे सर्वच जातीने सहभागी होत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणांत लोक स्वतःहून रस्त्यावर उतरतात याचा अर्थ त्यांना हा मुद्दा वैयक्तिकरीत्या भिडतो. पर्यावरणासारख्या सर्वमान्य व संवेदनशील विषयाचे धार्मिक धृवीकरण करणे हे नाशिकच्या सामाजिक बांधणीला धक्का देणारे आहे.नाशिकचे वैशिष्ट्य म्हणजे येथील सांस्कृतिक सौहार्द, धार्मिक विविधता आणि निसर्गाशी असलेली जवळीक असे म्हणता येईल. एकीकडे नागरिक एकत्र येऊन झाडांसाठी लढत असतांना दुसरीकडे असा धार्मिक तुलनांचा विषय उपस्थित करूण समाजात शंका-गैरसमज निर्माण करणे हे नेतृत्वाच्या जबाबदारीला न साजेशी गोष्ट आहे.

## प्रासंगिक »

### फसलेली उड्डाणे!

***प्रवाशांची सुरक्षा ही सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या केंद्रस्थानी आहे.***

गेल्या आठवड्यापासून प्रत्येकजण विमान प्रवासातील अडथळे, प्रवाशांना आलेल्या अडचणी आणि देशातील सर्वात मोठ्या विमान कंपनीच्या कामकाजातील अपयशांबद्दल बोलत आहे. या चर्चा या संपूर्ण परिस्थितीसाठी सरकारला जबाबदार धरण्याभोवती फिरत आहेत किंवा मोठ्या औद्योगिक घराण्यांनी भविष्यातील व्यवसाय ताब्यात घेण्यासाठी धोरणात्मकरित्या ऑपरेशन्समध्ये अडथळा आणण्याचा कट रचला आहे; परंतु विमान कंपनीच्या अपयशाची मूळ कारणे शोधण्याचा कोणताही प्रयत्न केला जात नाही. विमान कंपन्यांच्या मक्तेदारी प्रवृत्तींनाही जबाबदार धरले जाते. वेळीच त्यांच्यावर कारवाई केली गेली नाही, तर सामान्य लोकांना त्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची किंमत मोजावी लागेल. देशातील विमान कंपन्या पूर्णपणे खासगी क्षेत्रात आहेत आणि सरकार केवळ कायदेशीररित्या त्यांच्यावर नियंत्रण ठेवू शकते. विमान वाहतूक क्षेत्रात खासगीकरण ही गेल्या.

प्रतिष्ठेशी तडजोड शक्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारत सरकारने महिलांची सुरक्षा, संरक्षण आणि सक्षमीकरणासाठीचा व्यापक कार्यक्रम असलेल्या 'मिशन शक्ती' च्या माध्यमातून संस्थात्मक चौकटीत रूपांतरित करून हा विश्वास पुन्हा दृढ केला आहे.

# सक्षम स्त्री, सक्षम भारत



सुविधा याला सर्वाधिक महत्त्व देते. हे मार्गदर्शक शब्द म्हणजे केवळ भावना नाहीत, तर तो पाया आहे, ज्यावर मोदी सरकारने मिशन शक्तीअंतर्गत भारताच्या कानाकोपऱ्यांत महिला सक्षमीकरणासाठी मजबूत संस्थात्मक यंत्रणा उभारली आहे. या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी मिशन शक्तीच्या संबल उपयोजनेंतर्गत कार्यरत असलेली वन स्टॉप सेंटर (ओएससी) आहेत. २०१५ मध्ये सुरू केलेली ही केंद्रे हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना एकात्मिक प्रतिसाद यंत्रणा प्रदान करतात, जेणेकरून त्यांना गप्प राहून त्रास सहन करावा लागत नाही अथवा खंडित आधार व्यवस्थांमधून मार्ग शोधावा लागत नाही.

आतापर्यंत भारतभरात ८६२ ओएससी कार्यरत आहेत. इथे एकाच छताखाली १२.२० लाखांहून अधिक महिलांना कायदेशीर मदत, वैद्यकीय सहाय्य, पोलिस सुविधा, निवारा आणि मानसिक समुपदेशन यासारखा एकात्मिक आधार प्राप्त झाला आहे. भयापासून स्वातंत्र्यापर्यंत, शांततेपासून आधारापर्यंत ओएससी आहेत. तिथे उपचार सुरू होतात. ही केंद्रे प्रतिक्रियाशील प्रशासनाकडून सक्रिय प्रशासनाकडे होणारे परिवर्तन दर्शवतात. एखाद्या महिलेला घरात, कामाच्या ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणी हिंसाचाराचा सामना करावा लागत असला, तरी ओएससी त्या महिलेचे पुनर्वसन, सन्मान आणि न्याय मिळवून देण्याच्या मोदी सरकारच्या महिलांविरोधातील हिंसाचार हा केवळ महप्रश्न नाही, तर ती राष्ट्रीय चिंतेची बाब आहे. प्रत्येक ओएससीद्वारे प्रत्येक हेल्पलाईनला उत्तर दिले गेले आणि प्रत्येक प्रकरण सोडवले गेले. संकल्पाचे प्रतीक म्हणून कार्यरत आहेत, महत्त्वाचे म्हणजे, ही केंद्रे रुग्णालयांच्या आत अथवा त्याच्या जवळ आहेत, जेणेकरून वैद्यकीय सेवा त्वरित उपलब्ध होईल, संकटामध्ये दिलेल्या प्रतिसादाचे हे पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. महिला हेल्पलाईनचे सार्वत्रिकीकरणदेखील (१८१) तेवढेच महत्वाचे आहे, जे संकटात सापडलेल्या महिलांसाठी (२४७) सहाय्य सुनिश्चित करून ओएससीला पूरक ठरते. ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कार्यरत असलेल्या या हेल्पलाईनने २.५६ कोटी कॉल हाताळले आहेत आणि ९३.४८ लाखांहून अधिक महिलांना (३० सप्टेंबरपर्यंत) मदत केली आहे. आपत्कालीन प्रतिसाद समर्थन प्रणालीबरोबर (११२) जोडलेली ही हेल्पलाईन संकट आणि मदत यांच्यातील अंतर कमी करते. पद्धतशीर उत्तरदावित्व आणि जलद न्यायदानाला बळकटी देण्यासाठी आम्ही ७४५ फास्ट ट्रॅक विशेष न्यायालये स्थापन केली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ।।१।।

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ।।२।।

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## पालकांना काळजीने मनस्ताप

## मेस चालू होण्यास वेळ लागल्याने विद्यार्थी उपाशी

# विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सर्व नियम धाब्यावर बसवत येथील वैद्यकीय महाविद्यालयातील मेस (खानावळ) चालकाला काढून अन्य व्यक्तीस ही मेस चालविण्यासाठी अचानक दिल्याने वैद्यकीय विद्यालयातील निवासी विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. हा सर्व मनमानी कारभार अचानक आणि सुलतानी पद्धतीप्रमाणे केल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान रोजच्या जेवणासाठी असणारी व्यवस्था अचानक कोलमडल्याने सर्व विद्यार्थी परेशान तर विद्यार्थ्यांचे पालक काळजीने हैराण झाले आहेत. या परिस्थितीस जबाबदार असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी होत आहे.**

## रातोरात मेसचे कंत्राट बदलले



मागील कांही वर्षांपासून येथील वैद्यकीय महाविद्यालयात श्री योग बहुउद्देशीय सामाजिक संस्थेस मेस चालविण्यासाठी निविदेद्वारे कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. मुदत संपल्याने मध्यंतरी आणखी काही महिन्यांचा कालावधी वाढवून देण्यात आला होता. मात्र कसलीही निविदा प्रक्रिया न राबवता बुधवारी (१० नोव्हेंबर) ही मेस चालविण्यासाठी एका व्यक्तिस कार्यारंभ आदेश देण्यात आला. त्याच दिवशी मेस चालविणाऱ्या पूर्वीच्या संस्थेस काढून टाकण्यात आल्याचे कळविण्यात आले. त्या संस्थेने गुरुवारी (११ नोव्हेंबर) एक दिवसाची मुदत मागून घेत मेसची जागा सर्व साहित्यासह सोडली. दरम्यान दुसरा मेस चालक येण्यास उशीर झाल्याने आणि मेस चालू होण्यास वेळ लागल्याने विद्यार्थ्यांना उपाशी राहावे लागले. विद्यार्थ्यांच्या पालकांना काळजीने मनस्ताप सहन करावा लागला. दरम्यान मेससाठी कुठलीही निविदा प्रक्रिया न राबविता आपल्या मर्जीतील एकास ही मेस चालविण्याचे कंत्राट देण्यात आले आहे. शहरात महिला बचत गट आणि बेरोजगारांच्या अनेक संस्था असताना एका व्यक्तीस हे कंत्राट देण्याचे कारण गुलदस्त्यात असून यात मोठे अर्थकारण असल्याचे बोलले जात आहे. अचानकपणे घेतलेल्या या तुघलकी निर्णयास वैद्यकीय महाविद्यालयातील कोणता भस्मासुर कारणीभूत असेल हा प्रश्नही यामुळे उपस्थित झाला आहे. या महाविद्यालयात मुली आणि मुले मिळून ४०० विद्यार्थी संख्या असून चहा, नाष्टा आणि दोनवेळा जेवण देण्यात येते. जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी इथे वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. मेस प्रकरणात मनमानीपाने चालू असलेल्या गैरकरभरामुळे विद्यार्थ्यांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या प्रकारास विद्यार्थी संसद हे विदयार्थी संगठन जबाबदार असल्याचे संबंधित जबाबदार वरिष्ठ सांगत असले तरी कुठलेही नियम व कायदे न पळता मनमानी पद्धतीने सुरू असलेला वैद्यकीय महाविद्यालयातील कारभार यामुळे चव्हाट्यावर आला आहे. दरम्यान मी नागपूर मुक्कामी आहे. या मेसचे कंत्राट आपण बदलले नसून विद्यार्थी संसदेने बदलेले आहे. विद्यार्थ्यांची कसलीही गैरसोय झालेली नाही. असे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांनी दैनिक नवराष्ट्रला सांगितले आहे. मात्र निविदा प्रक्रिया पूर्ण न करता, आशा पद्धतीने मेसचे कंत्राट एका मर्जीतील व्यक्तिस देणे हे कुठल्या नियमात बसते. हा प्रश्न यामुळे अनुत्तरीतच राहिला आहे. दरम्यान या मनमानी कारभाराची चौकशी होऊन दोषींवर तात्काळ कारवाई व्हावी अशी मागणी केली जात आहे.सर्व नियम धाब्यावर बसवत येथील वैद्यकीय महाविद्यालयातील मेस (खानावळ) चालकाला काढून अन्य व्यक्तिस ही मेस चालविण्यासाठी अचानक दिल्याने वैद्यकीय विद्यालयातील निवासी विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. दरम्यान रोजच्या जेवणासाठी असणारी व्यवस्था अचानक कोलमडल्याने सर्व विद्यार्थी परेशान तर विद्यार्थ्यांचे पालक काळजीने हैराण झाले.

## सर्व नियम धाब्यावर

आहेत. या परिस्थितीस जबाबदार असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी होत आहे. मागील कांही वर्षांपासून येथील वैद्यकीय महाविद्यालयात श्री योग बहुउद्देशीय सामाजिक संस्थेस मेस चालविण्यासाठी निविदेद्वारे कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. मुदत संपल्याने मध्यंतरी आणखी काही महिन्यांचा कालावधी वाढवून देण्यात आला होता.

# थकीत घरपट्टी सवलतीचा ठराव फेटाळला

## नेरळ ग्रामसभेत वादळी चर्चेनंतर पाणीपट्टी वाढीला मंजुरी!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नेरळ ग्रामपंचायतीच्या (NERAL GRAM PANCHAYAT) ग्रामसभेत वादळी चर्चेनंतर अखेर पाणीपट्टी वाढीला मंजुरी मिळाली आहे. फेब्रुवारी २०२६ पासून नेरळ ग्रामस्थांना नव्या दराने पाणीपट्टी आकारली जाणार आहे.**

अनेक वर्षापासून थकीत असलेल्या घरपट्टी वसुलीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, थकबाकीमध्ये शासनाच्या अध्यादेशानुसार कोणतीही सवलत देऊ नये, असा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला आहे. प्रशासक सुजित धनगर यांच्या अध्यक्षतेखाली ही ग्रामसभा पार पडली.नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता धारकांकडे तब्बल ९० लाख रुपयांची घरपट्टी थकीत आहे. ग्रामसभेत थकीत घरपट्टी वसुलीबाबत चर्चा झाली. माजी सरपंच सावळाराम जाधव यांनी ठराव मांडला की, थकीत घरपट्टीमध्ये कोणालाही सवलत देऊ नये आणि संपूर्ण थकबाकी वसुलीसाठी ठोस नियोजन जाहीर करावे. शासनाच्या नियमानुसार ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय ग्रामसभा घेऊ शकते, असा नियम असतानाही, ग्रामस्थांनी सवलत देण्यास विरोध दर्शवणारा ठराव बहुमताने हात उंचावून मंजूर केला. दिलीप बोरसे यांनी या ठरावाला अनुमोदन दिले. जानेवारी २०२६ पासून सर्व थकीत घरपट्टी आणि पाणीपट्टी संकलनाचा कार्यक्रम ग्रामपंचायत हाती घेणार आहे.जलशुद्धीकरण केंद्रातून पुरवठा होणाऱ्या पाण्याची करवाढ करण्याचा विषय ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी मांडला. बहुसंख्य ग्रामस्थांनी पाणीपट्टी वाढीला विरोध दर्शवला. सूर्यकांत चंचे, सावळाराम जाधव, अक्षय चव्हाण, ॲड. सुमित साबळे यांसह अनेकांनी "आधी दोनवेळ पुरेसे पाणी द्या आणि नंतरच पाणीपट्टी वाढवा," अशी भूमिका घेतली. वादळी चर्चेनंतर अखेर मासिक पाणीपट्टी ₹२१० करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. नेरळ ग्रामपंचायतीने २०१३ मध्ये मासिक पाणीपट्टी ₹६० वरून ₹१२५ प्रति महिना केली होती. १२ वर्षांनंतर ही पाणीपट्टी वाढविण्यात आली असून, ती फेब्रुवारी २०२६ पासून लागू होईल. प्रशासक सुजित धनगर यांनी या काळात सर्व थकीत पाणीपट्टी वसुलीचे नियोजन केले जाईल, असे आश्वासन दिले.या ग्रामसभेत नेरळ गावातून जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या पाडा येथील फाटक बंद करण्याच्या रेल्वेच्या निर्णयावर चर्चा झाली. सूर्यकांत चंचे यांनी त्या ठिकाणी भुयारी मार्ग बनवण्याचा ठराव.



## रेल्वे भुयारी मार्गाचा ठराव मंजूर

अनेक वर्षापासून थकीत असलेल्या घरपट्टी वसुलीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, थकबाकीमध्ये शासनाच्या अध्यादेशानुसार कोणतीही सवलत देऊ नये, असा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला आहे. प्रशासक सुजित धनगर यांच्या अध्यक्षतेखाली ही ग्रामसभा पार पडली.

टप्पा २ – लोकसंख्या गणना

## वेगळ्या पद्धतीने करण्यात येणार जनगणना

# 2027 मध्ये होणार जनगणना

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्रिमंडळाने पुढील वर्षी म्हणजेच २०२७ मध्ये जनगणना करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जरी मूळतः २०२१ मध्ये करण्याचे नियोजन असले तरी, ती सहा वर्षांनी पुढे ढकलण्यात आली आहे. कोविड-१९ साथीच्या आजारामुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलण्यात आली. पहिल्यांदाच, ही पूर्णपणे डिजिटल जनगणना असेल, ज्यामध्ये जातींची जनगणना समाविष्ट असेल.**

## जनगणना प्रक्रिया म्हणजे काय?



भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. यामध्ये देशाची लोकसंख्या, सामाजिक-आर्थिक स्थिती आणि इतर महत्त्वाची माहिती गोळा केली जाते. भारतातील पहिली आधुनिक जनगणना १८७२ मध्ये ब्रिटिश राजवटीत करण्यात आली होती. स्वतंत्र भारतातील पहिली जनगणना १९५१ मध्ये करण्यात आली होती. आजपर्यंत १५ जनगणना करण्यात आल्या आहेत. १९४८ चा जनगणना कायदा जनगणनेसाठी कायदेशीर आधार प्रदान करतो, गोपनीयता सुनिश्चित करतो आणि सहकार्य अनिवार्य करतो. एकूणच, ही लाखो कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली एक मोठी प्रक्रिया आहे, जे डेटा संकलित करतात आणि अहवाल तयार करतात. जनगणना प्रक्रिया काय आहे, ती कशी केली जाते, कर्मचारी कसे काम करतात आणि कोणता डेटा गोळा केला जातो? भारतातील जनगणना ही गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त (RGI) यांच्या देखरेखीखाली केली जाते. ही प्रक्रिया दोन मुख्य टप्प्यात विभागली गेली आहे.हा पहिला टप्पा आहे, जो सामान्यतः जनगणनेच्या काही महिने आधी सुरू होतो. कुटुंबांची यादी केली जाते. घरांची संख्या आणि सुविधांबद्दल माहिती गोळा करण्यासाठी घरोघरी जाऊन गणना कर्मचारी काम करतात. हा टप्पा जनगणनेचा पाया रचतो, ज्यामुळे एकही घर चुकणार नाही याची खात्री होते. हवामान अनुकूल असताना एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान हे चालते.हा मुख्य टप्पा आहे जिथे प्रत्यक्ष लोकसंख्या गणना केली जाते. गणना करणारे घरोघरी जाऊन प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक माहिती गोळा करतात. हे सहसा फेब्रुवारी-मार्चमध्ये होते, जेव्हा लोक घरी असतात आणि हवामान थंड असते. स्थलांतरामुळे पुनरावृत्ती किंवा वगळणे टाळण्यासाठी ही प्रक्रिया देशभरात एकाच वेळी होते. ते “DE JURE” पद्धतीचा वापर करते, जिथे व्यक्तींची गणना त्यांच्या नेहमीच्या निवासस्थानावर केली जाते.२०२७ च्या जनगणनेची सुरुवात १ मार्च २०२७ पासून होईल आणि तयारी २०२६ मध्ये सुरू होईल. मंत्रिमंडळाने याला मान्यता दिली आहे. ही डिजिटल जनगणना असेल. याचा अर्थ जनगणना कर्मचारी लोकांच्या घरी डिजिटल गॅझेट्स घेऊन भेट देतील आणि कागदाऐवजी त्यांचा वापर करतील. जनगणना करणारे टॅब्लेट किंवा मोबाईल APP वापरू शकतात. नागरिकांना स्व-गणनेचा पर्याय असेल, जिथे ते ऑनलाइन पोर्टलद्वारे त्यांची माहिती स्वतः प्रविष्ट करू शकतील. यामुळे कागदविरहित आणि जलद प्रक्रिया सुनिश्चित होईल जाती जनगणना – १९३१ नंतर प्रथमच, जातीशी संबंधित डेटा गोळा केला जाईल, जो सामाजिक धोरणांसाठी महत्त्वपूर्ण असेल घरांचे नकाशे तयार करण्यासाठी जीपीएस ट्रॅकिंगचा वापर केला जाईल, ज्यामुळे अचूकता वाढेल. १५ जानेवारी २०२६ पर्यंत राज्यांना अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही जनगणना राजकीयदृष्ट्याही महत्त्वाची आहे, कारण त्यामुळे लोकसभेच्या जागांची पुनर्रचना होऊ शकते.

### जनगणनेत नवीन काय आहे?

दुर्गम भागात पोहोचणे आवश्यक आहे. प्रत्येक क्षेत्राचा समावेश करणे आवश्यक आहे. भाषिक विविधतेमुळे देखील आव्हाने निर्माण होतात आणि लोक सहकार्य करू शकत नाहीत, परंतु हे अनिवार्य असल्याने, पोलिस किंवा स्थानिक मदत देखील घेतली जाते. घरांना भेट देताना लोकांशी, विशेषतः महिलांशी कसे संवाद साधावा आणि त्यांच्याशी कसे संवाद साधावा याचे प्रशिक्षण दिले जाईल.

## सरन्यायाधिशांकडून सोशल मीडियाबाबत चिंता

# ‘मला कोणी धमकावू शकते असा विचारही करू नका

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**’सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी केलेल्या प्रारंभिक निरीक्षणांवर आधारित लोक अनेकदा स्वतःच्या कथा तयार करतात, मात्र अशा प्रतिक्रिया किंवा टीका त्यांच्या निर्णयक्षमतेवर कोणताही परिणाम करत नाही. ते याबाबत पूर्णपणे निष्पक्ष राहू शकतात,’ अशा शब्दांत सरन्यायाधीस सूर्यकांत यांनी प्रतिक्रीया दिली आहे.**



न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांवर सोशल मीडियावर होणाऱ्या टिप्पण्यांबद्दल सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी चिंता व्यक्त केली.माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीदरम्यान बोलताना सरन्यायाधीशांनी निरीक्षण व्यक्त केले. रेवण्णा यांनी त्यांच्या विरुद्ध चालू असलेल्या बलात्काराच्या खटल्यांची सुनावणी दुसऱ्या न्यायालयात हस्तांतरित करण्याची मागणी केली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, “रेवण्णा यांचे वकील सिद्धार्थ लुथरा आणि सिद्धार्थ दवे यांनी सुनावणीदरम्यान न्यायाधीशांच्या काही टिप्पण्यांचा हवाला देत, त्या नोंदवहीतून वगळण्याची मागणी केली. त्यांचे म्हणणे होते की, या टिप्पण्या वकिलांबाबत आक्षेपार्ह होत्या आणि त्यामुळे न्यायालय पक्षपाती असल्याचा आभास निर्माण होऊ शकतो, म्हणूनच खटला दुसरीकडे हस्तांतरित करावा. सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली असलेले न्यायमूर्ती जयमाला बागची यांनी सांगितले की न्यायाधीशांच्या टिप्पण्यांना पक्षपातीपणाचा आधार देता येत नाही. खंडपीठाने म्हटले आहे की, “याचिकाकर्त्याला मागील प्रकरणात दोषी ठरवण्यात आले आहे या वस्तुस्थितीमुळे न्यायाधीश प्रभावित होणार नाहीत आणि ते केवळ सध्याच्या खटल्यात सादर केलेल्या पुराव्यांवरच त्यांचे निष्कर्ष आधारित असतील यावर आम्हाला शंका घेण्याचे कोणतेही कारण नाही.”लाइव्ह लॉच्या अहवालानुसार, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की न्यायालयीन सुनावणीदरम्यान न्यायाधीशांकडून विचारले जाणारे प्रश्न हे फक्त दोन्ही बाजूंच्या युक्तिवादांची ताकद तपासण्यासाठी असतात आणि ते न्यायालयाच्या अंतिम मताचे प्रतिनिधित्व करत नाहीत. तरीही, लोक अनेकदा हे न समजता तत्काळ निष्कर्ष काढतात आणि सुनावणीदरम्यान विचारलेल्या प्रश्नांवर आधारित कथा तयार करतात, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

### ते मला धमकावू शकतात

कोणत्याही गोष्टीने प्रभावित होत नाही. जर कोणाला वाटत असेल की ते मला धमकावू शकतात, तर ते चुकीचे आहेत. मी खूप मजबूत माणूस आहे.”दरम्यान, अलीकडे सरन्यायाधिशांना माजी न्यायाधीश, वकील आणि कार्यकर्त्यांनी लिहिलेल्या खुले पत्र लिहीण्यात आले होते. त्या पत्रात सरन्यायाधीशांच्या रोहिंग्या संदर्भातील विधानावर आक्षेप घेण्यात आला होता.

# 'ऑल इज वेल' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित



'तीन तिघाडा काम बिघाडा' ही म्हण खोटी ठरवत तीन मित्रांची धमाल दाखविणारा 'ऑल इज वेल' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी २७ जूनपासून सर्वत्र प्रदर्शित होत आहे. तत्पूर्वी या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर कलाकार व तंत्रज्ञांच्या उपस्थितीत नुकताच प्रकाशित झाला. याप्रसंगी निखळ हास्याची मेजवानी देणारा हा चित्रपट प्रेक्षकांना नक्की आवडेल, असा विश्वास दिग्दर्शक योगेश जाधव यांनी व्यक्त केला. तीन मित्रांची धमाल केमिस्ट्री आणि इतर कलाकारांचा मजेशीर अंदाज 'ऑल इज वेल' चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये दिसून येत आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शन सोहळ्यात बोलताना निर्माते अमोद मुचंडीकर, वाणी हालप्पनवर, तसेच सहनिर्माते मल्लेश सोमनाथ मरुचे, विनायक पट्टणशेट्टी म्हणाले की, 'काही तरी वेगळे करण्याच्या उद्देशाने आम्ही एकत्र आलो. प्रेक्षकांना धमाल करता येईल अशा कथानकाच्या शोधात असताना लेखक प्रियदर्शन जाधव, दिग्दर्शक योगेश जाधव आणि कार्यकारी निर्माते संजय ठुबे यांच्या सहकार्याने हा धमाल विषय आम्ही आणला आहे.हा चित्रपट म्हणजे सहकुटुंब अनुभवायला मिळणारी हास्याची मेजवानी असून मनोरंजनाची अफलातून पर्वणी असणार आहे.' काही दिवसांपूर्वीच 'ऑल इज वेल' या चित्रपटाचे एक मजेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आल्यानंतर चित्रपटाविषयी उत्सुकता अधिकच वाढली होती. त्यानंतर आता चित्रपटाचा धमाल ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे, रोहित हळदीकर, सयाजी शिंदे, अभिजीत चव्हाण, नक्षत्रा मेढेकर, सायली फाटक, माधव वझे, अजय जाधव, अमायरा गोस्वामी, दिशा काटकर या कलाकारांची जमून आलेली उत्तम भट्टी काही तरी धमाल घडवणार हे ट्रेलरवरून आपसूकच जाणवत आहे. 'ऑल इज वेल' चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश जाधव, तर लेखन प्रियदर्शन जाधव यांनी केले आहे. तर कार्यकारी निर्माते संजय ठुबे आहेत.

# जान्हवीचा मित्र 'मॅड' आहे तरी कोण?



'लक्ष्मी निवास' मालिकेत नुकताच वटपौर्णिमेचा सण साजरा करण्यात आला. एकीकडे 'बायको हीच हवी' म्हणत सिद्धूने भावनासाठी वडाच्या झाडाभोवती सात फेरे घेतले. तर, दुसरीकडे जान्हवीने लग्नानंतर तिची पहिली वटपौर्णिमा साजरी केली. पण, ऐन सणाच्या दिवशी जयंतने आपल्या बायकोची मोठी परीक्षा घेतली. जान्हवीचं आपल्यावर किती प्रेम आहे हे पाहण्यासाठी जयंतने मरणाचं नाटक केलं होतं. जयंतची अवस्था पाहून जान्हवी पूर्णपणे बिथरून गेली होती. सुरुवातीला जान्हवीने नवऱ्याची पल्स रेट चेक केला, त्याला शेवटी CPR दिला पण, या सगळ्याचा काहीच उपयोग होत नाही. जवळपास तासाभराने जयंतने केलेलं नाटक जान्हवीसमोर उघड होतं. यानंतर मात्र जानू खूप संतापते.जयंतला वैतागलेली जान्हवी स्वत:ला खोलीत कोंडून घेते. शेवटी जयंत तिची समजूत काढतो आणि दोघांमधला अबोला दूर होतो. पण, एवढं सगळं झाल्यावरही जयंत काही केल्या सुधारणार नाहीये. आताही जयंतच्या मनात जान्हवी अन् मॅंड्याचा ( विश्वा ) नात्याबद्दल संशय असतो.

# लोकप्रिय अभिनेत्रीने घेतली आलिशान गाडी!



गेल्या काही महिन्यांमध्ये गौरव मोरे, जान्हवी किल्लेकर, यशोमन आपटे अशा अनेक मराठी कलाकारांनी आलिशान गाड्या खरेदी करत आपली स्वप्नपूर्ती केल्याचं पाहायला मिळालं. आता नवीन गाडी घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत आणखी एका लोकप्रिय मराठी अभिनेत्रीचं नाव जोडलं जाणार आहे. या अभिनेत्रीने तिच्या आलिशान गाडीची पहिली झलक इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. 'अशी ही आशिकी' या चित्रपटामुळे अभिनेत्री हेमल इंगळे घराघरांत लोकप्रिय झाली. तिच्या सहज सुंदर अभिनयाने अल्पावधीतच हेमलने सर्वांचं मन जिंकून घेतलं. अभिनेत्रीच्या घरी नुकतंच नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे. हेमलने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करत नव्या कारची झलक सर्वांना दाखवली आहे. यावेळी तिचा पती व अन्य कुटुंबीय देखील उपस्थित होते. वैयक्तिक आयुष्यात हेमल यंदाच्या वर्षी जानेवारी महिन्यात विवाहबंधनात अडकली. जवळपास साडेसात वर्षांच्या रिलेशनशिपनंतर हेमल आणि रौनक विवाहबंधनात अडकले. आता अभिनेत्रीने तिच्या चाहत्यांना नवीन गाडी खरेदी करत आनंदाची बातमी दिली आहे.हेमल व तिच्या पतीने ही आलिशान गाडी खरेदी केली आहे. या आलिशान कारची किंमत जवळपास ५३ लाखांच्या घरात आहे. ( एक्स-शोरुम ) अशी माहिती फायनान्सशियल एक्स्प्रेसने दिली आहे. सध्या मराठी कलाविश्वातून हेमलवर या नव्या कारसाठी कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.



# तारा करणार 'ती' चूक; तिचे सत्य उघडकीस येणार का?

सावळ्याची जणू सावली' मालिकेत अनेक ट्विस्ट पाहायला मिळत आहेत. सावली व सारंग यांच्यातील केमिस्ट्री प्रेक्षकांना आवडू लागल्याचे दिसत आहे. सारंग व सावलीच्या मध्ये येऊ पाहणारी अस्मी आता त्यांच्या आयुष्यातून निघून गेली आहे. मात्र, आता मेहेंदळे कुटुंबात तारा सोहमशी लग्न करून आली आहे. तारा सावलीला सतत त्रास देत असल्याचे दिसत आहे. कधी ती तिचा स्वयंपाक खराब करण्याचा प्रयत्न करते, कधी तिला इजा व्हावी म्हणून खिळे टाकते, तर कधी तिला धमकी देताना दिसते.मालिकेत दाखविल्याप्रमाणे सावली तारासाठी गाणे गाते. गरीब कुटुंबातील सावलीचा आवाज चांगले असल्याचे ओळखून ताराची आई भैरवी वझे तिच्या आवाजाचा वापर करायचा ठरवते. तारासाठी सावली गाणे गात राहील, तिचा आवाज भैरवीकडे गहाण राहील आणि त्या बदल्यात भैरवी सावलीच्या कुटुंबाला आर्थिक मदत करेल, असे भैरवीने करार केला होता. अनेकदा भैरवी सावलीला त्रास देते. जगासमोर तारा लोकप्रिय गायिका आहे, पण खरेतर तो आवाज सावलीचा आहे; हे रहस्य मोजक्या लोकांना माहीत आहे. आता 'सावळ्याची जणू सावली' मालिकेचा एक प्रोमो समोर आला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, तारा कोणाशीतरी फोनवर बोलत आहे. ती म्हणते, कोणाला शंका यायला नाही पाहिजे की मी नाही तर सावली गात आहे. कळलं? म्हणून ती मोठ्याने विचारते. तितक्यात तिथे ऐश्वर्या आलेली दिसते, ते पाहून ताराला धक्का बसतो. प्रोमोमध्ये पुढे पाहायला मिळते की सावलीसह सारंग तिच्या माहेरी आला आहे. सावलीचा भाऊ आजारी आहे. ते दोघेही सखदेवच्या शेजारी बसले आहेत.

## सूर्यवंशीचे वादळी शतक

## वैभव सूर्यवंशी नेमकं काय म्हणाला?

# 'मी बिहारचा, मला फरक पडत नाही!

### ९ चौकार आणि १४ षटकार



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शुक्रवारी खेळवण्यात आलेल्या अंडर १९ आशिया कपच्या पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीच्या वादळी शतकाच्या जोरावर भारत १९ वर्षांखालील संघाने आशिया कप स्पर्धेत युएई १९ वर्षांखालील संघासमोर ५० षटकांत ६ बाद ४३३ धावांचा मोठा डोंगर उभा केला आणि भारताने युएईचा तब्बल २३४ धावांनी पराभूत केले. १९ वर्षाखालील एकदिवसीय सामन्यात ४३३ ही भारताची अंडर १९ एकदिवसीय सामन्यातील आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या आहे आणि अंडर-१९ आशिया कपच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. सामन्यानंतर वैभव सूर्यवंशीने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.**

शुक्रवारी खेळलेल्या अंडर १९ आशिया कपच्या पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीची बॅट चांगलीच तळपली. त्याने ९५ चेंडूत १७१ धावा केल्या. या खेळीत त्याने ९ चौकार आणि १४ षटकार ठोकले. त्याच्या शतकाच्या जोरावर प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने यजमान यूएईविरुद्ध ४३३ धावा काढल्या.वैभव सूर्यवंशी सामन्यानंतर त्याच्या फलंदाजीबद्दल त्याने प्रतिक्रिया दिली.सूर्यवंशी म्हणाला की, "मला सुरुवातीला वाटले की हा ५० षटकांचा सामना आहे, म्हणून मी १० ते १२ षटके काळजीपूर्वक खेळून काढण्याचा निर्णय घेतला आणि नंतर मी माझ्या शैलीत खेळायला सुरुवात केली." यावेळी जेव्हा वैभवला सामन्यादरम्यान यूएई संघाकडून करण्यात आलेल्या स्लेजिंगबद्दल विचारले असता वैभव म्हणाला की, "मी बिहारचा आहे, आणि माझ्या पाठीमागे कोणी काय बोलते याचा मला काही एक फरक पडत नाही."सामन्याआधी यूएईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि भारताला फलंदाजीला बोलवले. यावेळी भारताकडून कर्णधार आयुष म्हात्रे ४ धावांवर बाद झाला. तर वैभव सूर्यवंशीने ९५ चेंडूत १७१ धावा केल्या. आरोन जॉर्जने ७३ चेंडूत ६९ धावा आणि विहान मल्होत्राने ५५ चेंडूत ६९ धावा फटकावल्या. याशिवाय वेदांत त्रिवेदीने ३८, अभिज्ञान कुंडूने ३२ आणि कनिष्क चौहानने २८ धावा केल्या. भारताच्या फलंदाजाच्या शानदार कामागीरीच्या जोरावर भारताने ४ वाद ४३४ धावा केल्या.यावेळी ४३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, यूएई संघ ५० षटकांत ७ गडी बाद केवळ १९९ धावा करू शकला. परिणामी यूएईला २३४ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव स्वीकारावा लागला. यूएईकडून आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या उद्दीश सुरीने सर्वाधिक ७८ धावा केल्या. भारताकडून दीपेश देवेंद्रने २ बळी घेतले, तर किशन सिंग, हेनिल पटेल, खिलन पटेल आणि विहान महलोत्रा यांनी प्रत्येकी १ बळी घेण्यात यश आले.शुक्रवारी खेळवण्यात आलेल्या अंडर १९ आशिया कपच्या पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीच्या वादळी शतकाच्या जोरावर भारत १९ वर्षांखालील संघाने आशिया कप स्पर्धेत युएई १९ वर्षांखालील संघासमोर ५० षटकांत ६ बाद ४३३ धावांचा मोठा डोंगर उभा केला आणि भारताने युएईचा तब्बल २३४ धावांनी पराभूत केले. १९ वर्षाखालील एकदिवसीय सामन्यात ४३३ ही भारताची अंडर १९ एकदिवसीय सामन्यातील आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या आहे आणि अंडर-१९ आशिया कपच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. सामन्यानंतर वैभव सूर्यवंशीने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.शुक्रवारी खेळलेल्या अंडर १९ आशिया कपच्या पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीची बॅट चांगलीच तळपली. त्याने ९५ चेंडूत १७१ धावा केल्या. या खेळीत त्याने ९ चौकार आणि १४ षटकार ठोकले. त्याच्या शतकाच्या जोरावर प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने यजमान यूएईविरुद्ध ४३३ धावा काढल्या.

### सामन्याचा निकाल

सूर्यवंशी म्हणाला की, "मला सुरुवातीला वाटले की हा ५० षटकांचा सामना आहे, म्हणून मी १० ते १२ षटके काळजीपूर्वक खेळून काढण्याचा निर्णय घेतला आणि नंतर मी माझ्या शैलीत खेळायला सुरुवात केली." यावेळी जेव्हा वैभवला सामन्यादरम्यान यूएई संघाकडून करण्यात आलेल्या स्लेजिंगबद्दल विचारले असता वैभव म्हणाला की, "मी बिहारचा आहे, आणि माझ्या पाठीमागे कोणी काय बोलते याचा मला काही एक फरक पडत नाही.

# अबब! T20 क्रिकेटमध्ये ठोकले द्विशतक

## 23 षटकारांची आतिषबाजी करत फलंदाजाने विरोधी संघाला केले उद्ध्वस्त




। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ या स्पर्धेला ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. भारत आणि श्रीलंकेत या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होणार असून प्रेक्षकांना मोठ्या धावसंख्येचा आणि स्फोटक फलंदाजीचा आनंद घेण्याची संधी मिळण्याची अपेक्षा आहे.**

दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान आणि इंग्लंडसारख्या मातब्बर संघांवर असणार आहेत. अशातच आता नेदरलँड्स संघाचा कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने टी-२० सामन्यात द्विशतक झळकावून आपली क्षमता दाखवून दिली आहे.ऑस्ट्रेलियातील स्थानिक टी-२० स्पर्धेत खेळत असताना, स्कॉट एडवर्ड्सने चौकार आणि षटकारांची अतिषबाजी केली आहे. ज्यामुळे गोलंदाजांची चांगलीच धुलाई झाली. क्लेन्झो ग्रुप शील्ड स्पर्धेत अल्टोना स्पोर्ट्स टी-२० फर्स्ट इलेव्हनकडून खेळत असताना स्कॉट एडवर्ड्सने चौथ्या फेरीच्या सामन्यात तुफानी द्विशतक ठोकले आहे. नेदरलँड्ससाठी ८२ टी-२० सामने खेळलेल्या एडवर्ड्सने स्थानिक गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला.८१ चेंडूत २३ षटकार आणि १४ चौकार ठोकले आहे. विल्यम्स लँडिंग एससी टी-२० विरुद्धच्या या सामन्यात एडवर्ड्सच्या संघाने प्रथम फलंदाजी केली आणि त्याने स्वतः डावाची दमदार सुरुवात केली. उजव्या हाताच्या फलंदाजाने विल्यम्सच्या गोलंदाजांवर चांगलाच हल्ला चढवला. त्याने फक्त ८१ चेंडूत २२९ धावांची वादळी खेळी केली. पहिल्या चेंडूपासून शेवटच्या चेंडूपर्यंत तो नियंत्रणात दिसून आला. त्याच्या डावात एडवर्ड्सने चौकारांपेक्षा जास्त षटकारच ठोकले. त्याने यावेळी २८२ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली.

### अल्टोनाने संघाचा सहज विजय

आणि या दरम्यान त्याने २३ षटकार आणि १४ चौकार मारले.एडवर्ड्सचे द्विशतक स्थानिक स्पर्धेत झळकवले असल्याने हे द्विशतक अधिकृत रेकॉर्डमध्ये गणण्यात येणार नाही. टी-२० विश्वचषकात त्याच्या किंवा त्याच्या संघाच्या कामगिरीवर याचा कोणताही महत्त्वपूर्ण परिणाम होण्याची शक्यता देखील कमी होण्याची शक्यता आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार।
। दि. 13 डिसेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## गुणवत्ता स्पर्धा 2025 द्वारे गुणवत्ता महिना साजरा

# 360 जणांचा उत्स्फूर्त सहभाग!

### शिक्षण विश्व: कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या वतीने आयोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गुणवत्ता स्पर्धा २०२५ द्वारे गुणवत्ता महिना साजरा करणे हे एक जबरदस्त यश होते. उत्साही सहभाग, अंतर्दृष्टीपूर्ण केस स्टडीज, सर्जनशील अभिव्यक्ती आणि मजबूत उद्योग प्रतिनिधित्व यामुळे या कार्यक्रमाने संस्कृती म्हणून गुणवत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया पुणे चॅप्टर ने विकसित भारताच्या दृष्टिकोनात योगदान देऊन, संस्थांमध्ये व्यवसाय उत्कृष्टता आणि टीक्यूएम पद्धतींना चालना देण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे.**



क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया पुणे चॅप्टरने भोसरी येथील क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटर येथे क्वालिटी स्पर्धा २०२५ आयोजित करून क्वालिटी महिना साजरा केला. हे सलग १२ वे वर्ष आहे, ज्यामुळे एकूण गुणवत्ता व्यवस्थापन ( टीक्यूएम) आणि उद्योगांमध्ये सतत सुधारणांना प्रोत्साहन देण्याच्या चॅप्टरच्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली.

या कार्यक्रमात ४२ उद्योग संस्थांमधील ३६० जणानी सहभाग घेतला. एकूण १५१ नामांकने मिळाली. ८६ केस स्टडी, १ स्किट्स, ३८ पोस्टर्स आणि २४ स्लोगन. या स्पर्धेत संघांनी त्यांची गुणवत्ता सुधारणा यशोगाथा, स्लोगन, पोस्टर आणि स्किट सादर केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जेबीएम ग्रुपचे सहाय्यक उपाध्यक्ष मिलिंद जठार यांनी दीपप्रज्वलन करून केले. क्यूसीएफआय चे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे आणि कौन्सिल सदस्य माधव बोरवणकर, संजीव शिंदे, अनंत क्षीरसागर, प्रकाश यार्दी हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे अभिजीत डाय अँड टूल्स ग्रुपचे सीईओ जयमुरुगन थांगवले होते. क्यूसीएफआय चे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे यांनी प्रमुख पाहुण्यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले.

केस स्टडीच्या मूल्यांकनासाठी परीक्षक मनीष फाले , प्रशांत मुधलवाडकर , वेंकटेश राव, अजय अंबिके, शिरीष शहाणे, राहुल रणाळकर, विठ्ठल वाकचौरे आणि रितू मेहता होते. घोषवाक्य आणि पोस्टर मूल्यांकन, धनंजय वाघोलीकर आणि परवीन तरफदार यांनी केले. पवनकुमार रवंदळे यांनी गुणवत्तेवर प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली.

परीक्षक, प्रमुख पाहुणे जयमुरुगन थांगवले आणि क्यूसीएफआय पुणे चॅप्टर कौन्सिल सदस्यांच्या हस्ते विजेत्याना सुवर्ण , रौप्य व कास्य पदक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया रुमाले यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रशांत बोराटे, रहीम मिझबिग व चंद्रशेखर रुमाले यांनी केले.

---

## डुडुळगाव- किवळेतील "घरकुलाचे स्वप्न" होणार साकार

### आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश; प्रधानमंत्री आवास योजना, सोमवारी होणार सोडत

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील डुडुळगाव व किवळे येथील घरकुल प्रकल्पांच्या संगणकीय सोडतीला अखेर मुहूर्त मिळाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याला अखेर त्यांच्या मागणीला यश मिळत असून, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत या दोन्ही प्रकल्पांची सोडत सोमवारी, दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, पिंपळेगुरव येथे पार पडणार आहे.**



प्रधान मंत्री आवास योजना-शहरी
Pradhan Mantri Awas Yojana-Urban

महापालिकेने केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने डुडुळगाव येथे १ हजार १९० तर किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ७५५ सदनिकांची उभारणी केली आहे. या प्रकल्पांसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. त्यातील पात्र अर्जांची छाननी पूर्ण झाली असून आता संगणकीय सोडत प्रक्रियेचे औपचारिक आयोजन केले जात आहे. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण महापालिकेच्या अधिकृत फेसबुक व युट्यूब चॅनेलवर उपलब्ध असेल, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिली.

आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, बैठका आणि शासन-प्रशासनाशी झालेल्या चर्चेमुळे अखेर हा महत्वाचा टप्पा गाठला गेला असून हजारो कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड शहरात होत असून, आतापर्यंत सुमारे 19 हजाराहून अधिक सदनिकांची निर्मिती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, आगामी काळात शहर झोपडपट्टी मुक्त आणि प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे, असा संकल्प करण्यात आला आहे.

> "डुडुळगाव आणि किवळे येथील घरकुल प्रकल्पांची सोडत लवकरात लवकर व्हावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. अखेर ही मागणी मान्य होऊन 2 हजार कुटुंबांच्या डोक्यावर स्वतःच्या घराचे छत उभे राहणार आहे, ही आमच्यासाठी आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. सामान्य नागरिकांचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या या उपक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांच्यासह महापालिका प्रशासन व शासनाचे मी मनःपूर्वक आभार मानतो."
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक रणधुमाळी : महाईन्यूज सर्व्हेक्षण।

# तळवडे-रुपीनगरमध्ये 48.28 टक्के लोकांना वाटते भाजपाचे पॅनेल मजबूत होईल!

## माजी नगरसेवक प्रवीण भालेकर भाजपाच्या वाटेवर : 25 टक्के लोक म्हणतात; राष्ट्रवादी फटका नाही!

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. प्रभाग-12 तळवडे–रुपीनगर परिसरातील राजकारणात मोठे बदल घडवू शकणारी घडामोड समोर आली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी नगरसेवक प्रवीण भालेकर यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वात प्रवेश ~~करण्याचे सूतोवाच केले.~~ त्यामुळे राजकीय तर्कवितर्क लढवण्यात येवू लागेल.**



याबाबत "महाईन्यूज"च्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये तळवडे-रुपीनगरमध्ये 48.28 टक्के लोकांना वाटते भाजपाचे पॅनेल मजबूत होईल. तर, 25 टक्के लोक म्हणतात; राष्ट्रवादी फटका बसणार नाही. सर्वेक्षणामध्ये सोशल मीडियावर सक्रीय 671 नागरिकांची मते घेण्यात आली.

**महाईन्यूजने विचारलेले प्रश्न :**

**1. राष्ट्रवादीच्या पॅनेलला फटका बसेल?**
नेटिझन्सलचा कल : 2.98 टक्के

**2. भाजपाचे पॅनेल मजबूत होईल?**
नेटिझन्सलचा कल : 48.28 टक्के

**3. राष्ट्रवादीला फटका बसणार नाही?**
नेटिझन्सलचा कल : 25 टक्के

**4. भाजपाचे पॅनेल मजबूत होणार नाही?**
नेटिझन्सलचा कल : 4.28 टक्के

**5. राष्ट्रवादीचे मा. नगरसेवक पंकज भालेकर यांच्या वर्चस्वाला धक्का बसेल?**
नेटिझन्सलचा कल : 3.12 टक्के

**6. भाजपाचे मा. नगरसेवक शांताराम भालेकर (SK) यांची ताकद वाढेल?**
नेटिझन्सलचा कल : 5.36 टक्के

**7. वरीलपैकी अंदाज काहीच सांगता येत नाही?**
नेटिझन्सलचा कल : 1.63 टक्के

**8. उमेदवार घोषित झाल्यावर चित्र स्पष्ट होईल?**
नेटिझन्सलचा कल : 8.64 टक्के

### राजकीय निरीक्षण :

सोशल मीडियावर वातावरण पाहता, प्रवीण भालेकर यांचा राष्ट्रवादी सोडण्याचा निर्णय व राजकीय हालचालीचा थेट परिणाम राष्ट्रवादीच्या विद्यमान पॅनेलवर होऊ शकतो की नाही, याबाबत मतभिन्नता आहे. सर्वाधिक म्हणजे 48 टक्के लोकांचे म्हणणे आहे की भालेकरांच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादीचा पारंपरिक प्रभागात फटका बसेल. तर 25 टक्के लोक म्हणतात की राष्ट्रवादीचे स्थानिक नेतृत्व एकसंघ असल्याने त्यांच्यावर मोठा परिणाम होणार नाही. दरम्यान, भाजपाच्या स्थानिक गटातही या प्रवेशामुळे नवीन गणित आकार घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. माजी नगरसेवक शांताराम (एस.के.) भालेकर यांची ताकद वाढेल का? यावर 5.36 टक्के लोक होकार देतात. असे असले, तरी सध्या परिस्थिती अंदाजाधिष्ठित असल्याने अनेकजण कोणतेही ठोस मत मांडण्यास टाळाटाळ करत आहेत. "उमेदवार घोषित झाल्यावरच संपूर्ण चित्र स्पष्ट होईल", असा सूर मात्र सर्वच राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त केला जात आहे. एकूणच प्रभाग-12 मधील आगामी निवडणुकीचे राजकीय समीकरण आता अधिकच रोचक व अनिश्चित बनले असून, पुढील काही दिवसांत आणखी हालचाली घडण्याची चिन्हे दिसत आहेत.

---

# एकजूट, समर्पण अन् लोकसंपर्कातून भाजपाचा विजय निश्चित!

## पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा कार्यकर्त्यांना विश्वास

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी महापालिका निवडणुकीत पक्षाची-कार्यर्त्यांची "एकजूट, समर्पण आणि सततची लोकसंपर्क मोहीम आणि विकासकामांच्या बळावर भाजपाचा विजय अटळ आहे," असे ठाम वक्तव्य शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केले.**



भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी ग्रामविकास मंत्री व राज्याचे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त शहर भाजपाच्या वतीने "कार्यकर्ता एकत्रिकरण मेळावा" उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष काटे बोलत होते. शहर भाजपाच्या वतीने आयोजित मेळाव्यात सुरुवातीला स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहर कार्यकारिणीचा विस्तार जाहीर करत अनेक कार्यकर्त्यांना उपाध्यक्ष, सचिव अशा विविध पदांवर नियुक्त करण्यात आले. घोषणेनंतर सभागृहात उपस्थित कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचे स्मरण करून सांगितले की, "मुंडे साहेबांचे व्यक्तिमत्त्व हे कार्यकर्त्यांसाठी प्रेरणागौरव आहे. त्यांच्या आदर्शांवर चालतच आपण भाजपाला घराघरात पोहोचवू शकतो." आगामी महापालिका निवडणुकीकडे कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे आणि संघटित प्रयत्नांतून प्रचंड मताधिक्याने पक्षाला विजय मिळवून द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मेळाव्यास संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस वेशाली खाड्ये, मधुकर बच्चे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशीव खाडे, माजी उपमहापौर केशव घोळवे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक योगीता नागरगोजे, माउली थोरात, राजू दुर्गे, महेश कुलकर्णी, कुणाल लांडगे, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, हर्षद नढे, संजय मंगोडीकर यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून कार्यकर्त्यांनी मुंडे साहेबांच्या आदर्शांवर चालत संघटना अधिक मजबूत करण्याचा संकल्प व्यक्त केला.

> "एकजूट आणि कटिबद्धतेतच आमचे सामर्थ्य आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचा समर्पण आणि मेहनतच भाजपाला विजयी बनवते. आपण एकत्र काम करून, स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या आदर्शांवर चालत, समाजाच्या सेवेसाठी नेहमी पुढे राहूया. प्रत्येक घरात भाजपाचे विचार पोहोचविणे आणि शहराला यशाच्या शिखरावर पोहोचवणे हेच आमचे उद्दिष्ट आहे."
> **—शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



## आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून

# मनपा शाळांचा कायापालट : निशा यादव

### कुदळवाडी मनपा शाळेत 'कलाविष्कार' स्नेहसंमेलनाचे निशा दिनेश यादव यांच्या हस्ते उद्घाटन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये झालेला आमूलाग्र कायापालट कुदळवाडी परिसरातही स्पष्टपणे जाणवत आहे. गुणवत्ता, सुविधा व शैक्षणिक वातावरण यामध्ये मोठी उंची गाठत मनपा शाळा ही भाजप सरकारची या भागातील यशस्वी ओळख ठरत असल्याचे इंद्रायणी महिला प्रतिष्ठान अध्यक्षा निशा यादव म्हणाल्या..**



पिंपरी चिंचवड मनपा कुदळवाडी शाळा क्र. ८९ तर्फे आयोजित "कलाविष्कार" वार्षिक स्नेहसंमेलनाचा सोहळा बुधवारी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन इंद्रायणी महिला प्रतिष्ठान अध्यक्षा निशा दिनेश यादव यांच्या हस्ते करण्यात आले. शाळांचे पदाधिकारी, परिसरातील ज्येष्ठ, नागरिक तसेच ग्रामस्थ विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना यादव म्हणाल्या, "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मनपा शाळांचे आजचे रूप पाहून आनंद वाटतो. मुलांना आपली कला मुक्तपणे मांडण्यासाठी मिळणारे व्यासपीठ हे खरोखर प्रशंसनीय आहे." प्रभागातील विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सतत सक्रिय असलेल्या निशा कार्यक्रमासाठी घेतलेल्या पुढाकाराचे सर्वांनी कौतुक केले. शाळेच्या मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती, *शिक्षकवृंद, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून सादर केलेल्या "कलाविष्कार" कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, शायरी, नाट्य, सांस्कृतिक प्रात्यक्षिके अशा अनेक कलाप्रकारांतून रसिकांची दाद मिळवली. पालकांचा मोठा उत्स्फूर्त सहभाग आणि परिसरातील मान्यवरांची उपस्थिती यामुळे कार्यक्रम अधिकच संस्मरणीय ठरला.




www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune